

# जीवनाला लाभलेली नवी दिशा

## (भाग २)

### मित्रांची अनपेक्षित भेट

ग्वाल्हेरहून निघताना रायकरला पत्र पाठवून मी दिल्लीच्या 'महाराष्ट्र समाजा'चा पत्ता दिला होता. त्या पत्त्यावर त्याचं एक पत्र आलं. एक अनपेक्षित आनंदाची आणि आश्चर्याची वार्ता त्या पत्रात होती.

मी मुंबई सोडल्यावर गाडगीळनं आणि झाडकरनं एअर-फोर्समध्ये प्रवेश मिळविण्यासाठी अर्ज केले होते. त्यांचं अनुकूल उत्तर येऊन ते दोघं भरतीही झाले होते. आणि तेरा डिसेंबरला मुंबईहून अंबाल्याला जाण्यासाठी निघाले होते. हे पत्र वाचल्याबरोबर मी अंबाल्याला जायचं ठरवलं. त्यांना भेटण्याची उत्सुकता मला दिल्लीत थांबू देत नव्हती. 'महाराष्ट्र समाजा'त माझा कार्यक्रम ठरला होता. पण त्याला दोन दिवस अवकाश होता, त्याचा फायदा मी घेतला.

श्री. वसंतराव ओकांनी कर्नाळला आणि अंबाल्याला अशी दोन पत्रं दिली. पहाटे मोटर सर्व्हिसनं निघून मी कर्नाळला पोचलो. ज्यांच्यासाठी पत्र होतं, ते एक पंजाबी संघ-स्वयंसेवक होते. त्यांनी मोठ्या प्रेमानं माझं स्वागत केलं.

डॉ. हेडगेवारांनी सुरू केलेल्या प्रयत्नाला मिळू लागलेलं यश मला तिथं प्रत्यक्ष अनुभवायला मिळालं. पंजाबपासून हजार-बाराशे मैल दूर असलेल्या महाराष्ट्रातला मी. माझी भाषा वेगळी, प्रांत वेगळा; पण जात, पंथ, भाषा, प्रांत, उच्च-नीच हे सारे भेदभाव इथं वितळून गेले होते. भाषेची किंवा प्रांतीयतेची अडचण तिथं आली नाही.

भेदभावरहित, उच्च-नीचता नष्ट झालेलं, परस्परांच्या आंतरिक प्रेमानं बांधलेलं प्रभावी हिंदुराष्ट्र निर्माण करण्याचं डॉक्टरांचं उद्दिष्ट आकार घेऊ लागलेलं मी पाहिलं. मुंबई सोडल्यापासून त्यावेळेपर्यंत मी मराठी भाषिकांच्याच घरी राहात होतो. पण एका पंजाबी कुटुंबात मी केवळ संघाचा स्वयंसेवक आहे, हे कळताच आपलेपणानं स्वागत होत होतं. त्यांच्या घराबाहेरच्या खटियावर आम्ही बसलो. त्यांनी घरातल्या साऱ्यांची ओळख करून दिली.

या ठिकाणची एक गमतीशीर आठवण अजून मला आहे. त्यांनी 'चहा पिणार की लस्सी पिणार', म्हणून विचारलं. थंडी भरपूर होती, त्यामुळे मी चहाच मागितला. घरातून थोड्या वेळात चहा आला. तो पाहून माझी छाती दडपून गेली. एक मोठा तांब्या आणि भला मोठा पेला भरून चहा आला होता. मी इतरांनी चहा प्यायला सुरुवात करण्याची वाट पाहिली. पण तसं कोणी करीना. मी त्यांना विचारल्यावर ते म्हणाले, "अरे भाई, यह चाय सिर्फ आपही के लिये है." जन्मापासून कपभर चहा पिण्याची सवय असलेला मी, हादरून गेलो. त्यांचा सारखा आग्रह चालला होता की, "फडकेजी, यह सारी चाय आपको लेना ही पडेगा." मी कसाबसा पेलाभर चहा संपवला.

गेल्या काही दिवसांत रिक्त हस्तानं परत येण्याचा अनेक वेळा अनुभव घेतलेला मी, मुक्त हस्तानं केलेल्या या स्वागतानं भारावून गेलो. कर्नाळला येण्याचं कारणही मी हळूच सांगितलं.

कार्यक्रम घडवून आणण्याविषयीची असमर्थता त्यांनी व्यक्त केली, पण खिशातून काही नोटा काढून त्यांनी माझ्या पुढं केल्या. मी अर्थातच त्या घेतल्या नाहीत. असे पैसे मला नको होते. त्यांनी खूप आग्रह केला, पण मी तो मानला नाही.

थोडा वेळ तिथं थांबून पुन्हा मोटार सर्व्हिसनं निघून अंबाल्याला आलो. मला आठवतं, दुपारी चारच्या सुमाराला मी अंबाल्याला पोचलो. रायजादा मूलराज तिथले संघचालक होते. त्यांनाच वसंतराव ओकांनी पत्र दिलं होतं. त्यांच्याकडं गेलो. सामान ठेवलं आणि अंबाल्याच्या 'एअरफोर्स ट्रेनिंग सेंटर'चा (Haig Lines) पत्ता विचारून तडक तिथं पोचलो.

अर्धा-पाऊण तास खटपट केल्यावर गाडगीळ आणि झाडकरांची भेट झाली. आम्ही एकमेकांना कडकडून मिठ्या मारल्या. त्या दोघांचे दुर्दिन संपले होते. त्या गणवेशात दोघंही रुबाबदार दिसत होते. त्यांना व्यक्तिमत्त्वही चांगलं लाभलं होतं. त्यांच्या ऑफिसरकडून परवानगी काढून ते दोघंही माझ्याबरोबर मूलराजजींच्या घरी आले. रात्री आम्ही घरी बरोबर जेवलो. खूप गप्पा मारल्या. साडेतीन महिन्यांनंतर आम्ही भेटत होतो.

मी मुंबई सोडल्यावर २१७ क्राऊन बिल्डिंगमधल्या, रायकरच्या घरातून एकेक जण हळूहळू कमी व्हायला लागला होता. मेहेंदळे निघून गेला होता. गाडगीळ,

झाडकर अंबाल्याला आले होते. रायकरविषयी मात्र सारे कृतज्ञ होते. मी केवळ या दोघांना भेटायलाच अंबाल्याला आलो होतो. लगेच दिल्लीला परतणं भाग होतं. चौकशी करता कळलं की, लाहोरहून किंवा अमृतसरहून दिल्लीला जाणारी मोटार अंबाल्याला रात्री तीनला येते. तिनं मी जायचं ठरवलं. मोटार ज्या ठिकाणी थांबत होती, ते ठिकाण गावाबाहेर हमरस्त्यावर होतं. एक झोपडीवजा घर, बाहेर खाटा टाकलेल्या, तिथं त्या मोटार सर्व्हिसचा एजंट आणि प्रवासी थांबलेले असत. गाडगीळ, झाडकरना इतक्या उशिरा कँपबाहेर राहायला परवानगी नव्हती. त्यांनी नऊ साडेनऊलाच मला त्या जागेवर पोचवलं आणि ते निघून गेले. पुन्हा आमची भेट होणार होती की नाही कुणास ठाऊक! ते लढाईवर होते. त्यातही वैमानिक म्हणून, म्हणजे धोका जास्त. माझं काय होणार होतं आणि मी कुठं जाणार होतो, त्याचाही काही नेम नव्हता. त्यामुळे ते निघून गेले आणि मला भयंकर एकाकी वाटू लागलं. मुंबई सोडताना मनाचा निग्रह करून बाहेर पडलो होतो. '२१७ क्राऊन बिल्डिंग'मधल्या सगळ्या सुहृदांचे स्नेहपाश दूर सारताना त्या वेळी आतून रडू येत होतं. त्यांच्यापैकी कुणाची कधी पुन्हा भेट होईल, याची खात्री नव्हती. १ सप्टेंबरपासून जगात एकाकी राहण्याची सवय लागत चालली होती. अनेकांच्या घरी, अनेक कुटुंबांत मी राहिलो; पण बाह्यत: हसतखेळत असलो, तरी आतून मी एकटा, एकाकी, निराधारच होतो. ज्या वाटेनं निघालो होतो, ती वाट कुठं नेणार आणि कुठं संपणार, याची काहीच कल्पना नव्हती. ज्या वेळी अशा जगण्याची सवय व्हायला लागली होती, त्याच वेळी या दोघांची अनपेक्षितपणे आणि अनपेक्षित ठिकाणी पुन्हा भेट झाली.

मी त्या झोपडीबाहेर बसून राहिलो. थंडी म्हणजे काय, याचा पहिला अनुभव त्या रात्री आला. डिसेंबरचा २०/२१ दिनांक असावा. सगळीकडं अंधार होता. झोपडीत गॅसची बत्ती होती. वाऱ्याच्या झोतांनी बर्फाच्या असंख्य सुयाच जणू अंगात घुसत होत्या. जवळजवळ पाच तास तिथं बसून होतो. मनाची सगळी कवाडं बंद झाली होती. आत होता नुसता अंधार, बर्फासारखा बोचणारा भयंकर अंधार.

रात्री अडीचच्या सुमाराला मोटार आली. सारे प्रवासी तिच्यात कोंबले गेले. भन्नाट वेगानं मोटार दिल्लीकडं निघाली. भयंकर वेग आणि महाभयंकर थंडी यांनी मी पूर्णपणे गारठून गेलो होतो. मोटार दिल्लीला पोचली, त्या वेळेला सकाळचे साडेसहा-सात वाजले असावेत. तोपर्यंत कसा जगलो, तेच कळत नाही. सारे प्रवासी उतरले, तरी दोन-चार मिनिटं मला कसली हालचाल करता येत नव्हती. मग हळूहळू उठलो. एका हमालानं बॅग-वळकटी उचलली. बोलायला शब्दच फुटत नव्हता. त्याला माझ्या मागं यायला खुणावून मोठ्या कष्टानं एकएक पाऊल टाकत ओकांच्या घरी आलो. अंबाल्याला जाताना, परत आल्यावर त्यांनी आपल्याकडं राहायला यायला सांगितलं होतं. मोटार-स्टँडपासून त्यांचं घरही फारसं लांब नव्हतं. त्यांच्या खोलीत शेगडी पेटलेली होती. मी बूट वगैरे न काढता, लगबगीनं त्या शेगडीजवळ जाऊन बसलो. किंचितही अतिशयोक्ती न करता सांगतो की, प्रत्यक्ष निखाऱ्यापासून फारतर अर्धा इंच अंतरावर मी माझे दोन्ही

हात धरले. दोन-तीन मिनिटांनंतर मला मोकळेपणी हातांची हालचाल करता आली.

अग्नीची उपयुक्तता त्या वेळी खऱ्या अर्थानं जाणवली. पंचमहाभूतांच्यापैकी दोघांच्या सामर्थ्याचा प्रत्यय काही तासांतच आला. त्याबरोबरच गरमगरम चहानं 'जिवात जीव आला', या म्हणीची सार्थकता पटवून दिली.

दिल्लीला लाल किल्ला आणि पांडव अथवा पुराणा किल्ला पाहताना आग्र्याचीच पुनरावृत्ती झाली. परक्या, आक्रमक मुसलमानांची सत्ता नष्ट होऊन शतकाहून अधिक काळ उलटल्यावरसुद्धा मोठ्या दिमाखात आणि त्याबरोबरच त्या मानानं पुरेशा वैभवात उभा असलेला हा लाल किल्ला आणि आमचं वैभव प्राचीन काळी जिथून जगाला दिपवून टाकीत होतं, तिथं असलेला ओसाड, वैराण आणि दीन अशा पडक्या अवस्थेतला, संपूर्णपणे दुर्लक्षित असा पांडव किल्ला ही आमच्या समाजाच्या 'मला काय त्याचं?' या वृत्तीचा पडताळा दाखविणारी दोन साक्षात प्रतीकं होती.

'महाराष्ट्र समाजा'त कार्यक्रम होता, त्या दिवशी संध्याकाळी साडेसात-आठच्या सुमाराला मी खालच्या खानावळीत जेवायला बसलो असताना अचानक मधू आपटे तिथं अवतरला. जेवणाचा डबा न्यायला आला होता. त्याची भेट सहा वर्षांनंतर दिल्लीसारख्या ठिकाणी अवचित व्हावी, हे आश्चर्य होतं. दोन दिवसांत तीन मित्र अशा रीतीनं अनपेक्षितपणे भेटले.

## आयुष्यातला महान अनुभव

अंबाल्याहून परत दिल्लीला आल्यावर पुढं काय करायचं, हा विचार मनात येत होता. मनात सारखी मुंबई होती. त्याबरोबर दुसराही विचार येत होता की, अनायासे इतक्या लांबवर आलो आहोत, तर हा सारा प्रदेश का पाहू नये? जवळ थोडे पैसे होते, त्यामुळे अगदीच कुठं काही मिळालं नाही, तरी मुंबईला परत जाण्यासाठी काही अडचण नव्हती. त्या दृष्टीनं चौकशी करायला लागल्यावर कळलं की, कानपूरला भाऊ जुगादे कॉलेजमध्ये शिकतो आहे. भाऊ जुगादे एलिचपूरचा. म्हणजे सध्याच्या अचलपूरचा स्वयंसेवक. नागपूरच्या ओ.टी.सी.त चांगला परिचय झालेला. वसंतराव ओकांनी त्याचा पत्ता दिला. गाडीत बसलो आणि सरळ कानपूरला आलो. एक्क्यात बसून भाऊ जुगादेच्या घरी आलो. एक्का म्हणजे छोट्याशा रथासारखा असलेला चौकोनी आकाराचा टांगा. त्यात कितीही माणसं बसवत असत. तिन्ही बाजूंना पाय बाहेर काढून बसायचं म्हणजे झालं. 'बिठूर कोठी' नावाची एक बंगली भाऊ जुगादे आणि इतर विद्यार्थ्यांनी भाड्यानं घेतलेली होती. अचानक मला आलेला पाहून भाऊला खूप आनंद झाला.

परमेश्वरी योजनेनं मला कानपूरला यायची बुद्धी झाली असली पाहिजे. आयुष्यातला एक फार मोठा धडा मला इथं मिळायचा होता. भाऊ जुगादे डी.ए.व्ही. कॉलेजमध्ये शिकत होता. त्या कॉलेजमध्ये माझा गाण्याचा कार्यक्रम ठरला. रात्री ९ च्या सुमाराला कार्यक्रम सुरू झाला. तबलजीची व्यवस्था झाली होती. कॉलेजचा हॉल विद्यार्थ्यांनी भरून गेला होता. भाऊ जुगादेनं आणि त्याच्या मित्रांनी माझी बरीच प्रसिद्धी केली होती.

सिनेमातली काही गाणी किंवा गजल-कव्वाली असं काहीतरी म्हणण्याची सूचना त्यांनी मला आधी केली होती. त्या दृष्टीनं मी मनाशी उजळणी केली. तेव्हा मला तसं काही फारसं येत नाही, याची जाणीव झाली. माझे आतापर्यंतचे कार्यक्रम मुख्यत: मराठी लोकांत झाले होते. शास्त्रीय संगीतच बहुतेक मी म्हणे. आणि सुगम म्हणावं लागलं, तर तेही मराठीतच असे. कानपूरचा विद्यार्थिवर्ग हा पूर्णपणे हिंदीभाषी होता. तिथं मराठी चालणार नव्हतं. मला 'गोपाळकृष्ण' या प्रभातच्या हिंदी सिनेमातली एक-दोन गाणी येत होती. एकदोन हिंदी भजनं येत होती. ती तीनचार गाणी मी म्हटली. सिनेमातली गाणी म्हटली, तेव्हा पोरं खूष झाली. 'प्रभात'च्या चित्रपटातली गाणी त्या वेळी सगळीकडे लोकप्रिय असत. भजन म्हणायला सुरुवात केली, तेव्हा वातावरण थोडं थोडं बदलत गेलं. भजनं हिंदी असली, तरी रागप्रधान गायकी थाटाचीच होती. दुसरं भजन सुरू केलं, तेव्हा हवा तापायला सुरुवात झाली. गडबड वाढू लागली. वातावरणातला हा बदल मला कळत होता. डिसेंबरमधल्या रात्रीच्या थंडीतसुद्धा माझ्या अंगाला थोडाथोडा घाम सुटायला सुरुवात झाली. माझ्या गाण्याच्या वेळी गडबड होते, हा अनुभव मला प्रथमच येत होता. कसंबसं मी दुसरं भजन संपवलं. कॉलेज विद्यार्थ्यांच्या समोर गाण्याच्या दृष्टीनं माझं भांडवल आता संपलं होतं. मी पुढं काय गातो, याकडं साऱ्या विद्यार्थ्यांचं लक्ष लागलेलं होतं. समोर तिन्ही बाजूंना मोर्चेबंदी सुरू झाली होती. त्यांच्या खाणाखुणा मला दिसत होत्या. मी उसनं अवसान आणून मोठ्या धीरानं एक जलद लयीतली सोपी चीज सुरू केली. चीज सुरू झाली मात्र, अर्ध्याएक मिनिटात तिथं हलकल्लोळ माजला. शिट्ट्या, कागदाचे बाण, आरडाओरड यांनी हॉल भरून गेला. माझ्या अंगावर कागदी बाणांचा पाऊस पडत होता. सुरुवातीला आपापल्या जागेवर बसलेले विद्यार्थी आता जागेवरून उठून स्टेजच्या दिशेनं येऊ लागले. मला काही समजेना. दरदरून घाम सुटला. गाणं तर बंद झालंच होतं. पण पेटी–तबला कसा सांभाळायचा, हाच प्रश्न उरला होता. भाऊ जुगादे आणि त्याच्या मित्रांनी माझ्याभोवती कडं केलं, त्यामुळे मी वाचलो. त्यांनी मला हॉलबाहेर काढलं. बाहेर आल्यावर मी तिथून अक्षरश: पळून गेलो.

### तिथला प्रेक्षकच वेगळा!

भाऊ जुगादेच्या खोलीवर आलो. भीतीनं नव्हे तर शरमेनं मी अर्धमेला झालो होतो. मी गरीब होतो, गरजू होतो, अप्रसिद्ध होतो, विद्यार्थ्यांच्या गरजा पुऱ्या करायला असमर्थ होतो; पण त्याचं हे असलं फळ मिळावं? मी पळून आलो, असं म्हणण्यापेक्षा विद्यार्थ्यांनी पळवून लावलं, हे जास्त खरं होतं. भाऊ जुगादेनं आणि त्याच्या मित्रांनी मला पुष्कळ समजावलं. माझा अपमान झाल्याचं त्यांना दु:ख झालं होतं. पण त्याला ते तरी काय करणार होते? झालेलं सारं मी फारसं मनाला लावून घेऊ नये, असं त्यांनी नाना प्रकारे सांगितलं. पण मी रात्रभर तळमळत होतो. प्रथम विद्यार्थ्यांचा राग आला होता. पण हळूहळू माझी कमतरता मला कळायला लागली. आतापर्यंत माझं गाणं

ऐकायला येणारा वर्ग वेगळा होता. महाराष्ट्रात शास्त्रीय संगीत ऐकणारा वर्ग बरा होता. इंदूर–ग्वाल्हेरला शास्त्रीय संगीताचा प्रसार भरपूर होता. दिल्लीला माझं गाणं मराठी लोकांसमोरच झालं होतं. कानपूरचा प्रेक्षकच वेगळा होता. ग्वाल्हेर, लखनौ सोडलं तर उत्तर भारतात शास्त्रीय संगीताची अभिरुची सामान्य लोकांत त्यावेळी तरी फारशी निर्माण झालेली नव्हती. विद्यार्थ्यांत तर मुळीच नव्हती. त्यातही मी कोणी नामवंत असतो, तर कदाचित त्यांनी नाखुषीनं का होईना, कसंतरी ऐकून घेतलं असतं. माझ्यासारख्यासाठी त्यांना आपला वेळ फुकट घालवायचं काहीच कारण नव्हतं. 'बेट्याला कसा धडा शिकवला', या आनंदात सारे विद्यार्थी आपापल्या घरी गेले असतील. त्यांनी मला खरोखरीच धडा शिकवला होता. त्यासाठी त्यांचे माझ्यावर उपकार आहेत, खूपच उपकार आहेत.

तिसऱ्या दिवशी काशीला गेलो. इंदूरला परिचय झालेले व इंदूरला कार्यक्रम घडवण्यात पुढाकार घेतलेले श्री. भाटे व आणखी एकदोन जण तिथल्या 'बनारस हिंदू विश्वविद्यालया'त शिकत होते, त्यांच्याकडे उतरलो. तिथं त्यांनी कार्यक्रम घडवून आणला. तो कार्यक्रम खाजगी होता. कार्यक्रम छान झाला. हिंदी व मराठी असा श्रोतृवर्ग होता. त्यांतही मराठी बरेच होते. बहुसंख्य विद्यार्थीच होते. काही प्राध्यापकही होते. कानपूरच्या उलट अनुभव इथं आला. त्यामुळे मनाची अस्वस्थता थोडीशी कमी झाली.

– कै. सुधीर फडके

(श्री. श्रीधर फडके यांच्या परवानगीने 'जगाच्या पाठीवर' या आत्मचरित्रातून क्रमशः)